दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष ६ वे || अंक ६३ || रविवार ०१ मार्च २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## सारडा महाविद्यालयात येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा

महेंद्र भगत अंजनगाव सुर्जी

स्थानिक अंजनगाव सुर्जी येथील नामावंत महाविद्यालय श्रीमती राधाबाई सारडा कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभाग अंतर्गत जेष्ठ कवी कुसुमाग्रज / वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्म दिना निमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.यात कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ प्राध्यापक डॉ.कविता हिरुळकर, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नितीन सराफ,तसेच मराठी विभाग प्रमुख डॉ.अंशुमती काहाने,प्रा.प्रणाली धुळे,डॉ. ममता गोटेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा.सुधीर बोंद्रे यांनी केले.एम.ए.मराठी भाग १ च्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व समजावून सांगितले.मनोगतात सहभागी विद्यार्थ्यांमध्ये मोनिका लेंडे,आरती मेटकर,मयूर रॉय इत्यादींनी सहभाग होता. ङ्गबी.ए.भाग ३ ची विद्यार्थीनी भूमिका तांबे हिने मराठीचे अभिमान गीत आपल्या सुंदर आवाजात सादर केले.आपल्या अतिथिय भाषणातून कुसुमाग्रजांच्या 'कणा' या कवितेचे महत्त्व डॉ.नितीन सराफ यांनी विशद केले.योग्य जागी योग्य शब्दांचा वापर करणे हेच मराठी भाषेचे वैशिष्ट्य आहे, हे त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.ङ्गआपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. कविता हिरुळकर यांनी मराठी मधील 'र्हस्व दीर्घ' बदलल्यास एका शब्दाचे कसे अर्थ बदलतात हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मराठी विभाग प्रमुख डॉ. अंशुमती काहाणे यांनी कवितेच्या माध्यमातून मराठीचे महत्त्व समजावून सांगितले. डॉ.ममता गोटेकर यांनी मराठी भाषा दिन व मराठी भाषा गौरव दिन यातील फरक व त्या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. प्रणाली धुळे यांनी केले, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.




## सासवड नगरपरिषदेचा ३९२ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर; नवीन पाणीपुरवठा योजना व नमो उद्यानावर भर

पुरंदर (प्रतिनिधी): सासवड नगरपरिषदेचे सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. २७) उत्साहात पार पडली. या सभेत ३९२ कोटी ६५ लाख ४७ हजार ४८८ रुपयांच्या खर्चाचा आणि कोणतीही करवाढ नसलेला सर्वसमावेशक अर्थसंकल्प सर्वानुमते मंजूर करण्यात आला. नगराध्यक्षा मा. आनंदीकाकी चंद्रकांत जगताप यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली.



महसुली आणि भांडवली तरतूद नगरपरिषदेने आगामी वर्षासाठी एकूण ४२६ कोटी १४ लाख ९२ हजार ४०६ रुपयांच्या जमा रकमेचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये महसुली जमा ४० कोटी ४३ लाख ७४ हजार ३९४ रुपये, तर भांडवली जमा ३५१ कोटी २४ लाख ६७ हजार १८१ रुपये अपेक्षित धरण्यात आली आहे. खर्चाच्या बाजूचा विचार करता, शहराच्या विकासासाठी भांडवली खर्चावर अधिक भर देण्यात आला असून त्यासाठी ३५३ कोटी ७६ लाख ७७ हजार १८१ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रमुख विकास प्रकल्प आणि योजनाङ्गङ्गशहराच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसंकल्पात काही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे, त्यामध्ये प्रामुख्याने: नवीन पाणीपुरवठा योजना: शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पाणीपुरवठा अधिक सक्षम केला जाणार आहे. नमो उद्यान: नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि पर्यटनासाठी आधुनिक उद्यानाची निर्मिती. भुयारी गटार योजना (टप्पा २): सांडपाणी व्यवस्थापनासाठी भुयारी गटार योजनेचा दुसरा टप्पा राबवला जाणार आहे. माझी वसुंधरा: पर्यावरण संवर्धन आणि शहर सौंदर्यीकरणावर विशेष भर. सामाजिक कल्याण आणि राखीव निधी शासकीय नियमांनुसार समाजातील विविध घटकांसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये दिव्यांग कल्याण निधी, महिला व बालकल्याण निधी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ५% निधी आरक्षित ठेवण्यात आला आहे. नगराध्यक्षांचे आभार सभेच्या समारोपप्रसंगी नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले. त्यांनी सांगितले की, ''शहराच्या विकासाला गती देताना सामान्यांवर कोणताही नवीन कर लादलेला नाही.'' या सभेला सर्व मान्यवर नगरसेवक, नगरसेविका, सर्व विभाग प्रमुख आणि कर्मचारी उपस्थित होते. मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.

## दु:खाच्या डोंगराखाली कांबळे कुटुंबाला 'अलकाश्री फाउंडेशन'चा आधार डॉ. श्रीराम खळगे यांची तत्काळ १० हजारांची मदत; ''आम्ही तुमच्या पाठीशी''

माजलगाव / प्रतिनिधी

एकापाठोपाठ मुलगा आणि वडिलांच्या निधनाने कांबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच 'अलकाश्री फाउंडेशन एक हात मदतीचा' या सामाजिक उपक्रमांतर्गत तात्काळ मदतीचा हात पुढे करण्यात आला.ङ्गघटनेची माहिती मिळताच डॉ. श्रीराम खळगे यांनी स्वतः कांबळे कुटुंबाच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट दिली. दुःखात बुडालेल्या परिवाराशी संवाद साधत त्यांनी कुटुंबीयांना धीर देत ''या कठीण प्रसंगी आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत'' असा विश्वास दिला.ङ्गयावेळी डॉ. खळगे यांनी तत्काळ १०,००० रुपयांची आर्थिक मदत सौ. गंगुबाई रामभाऊ कांबळे यांच्या हाती सुपूर्द केली. अचानक आलेल्या संकटात ही मदत कुटुंबासाठी दिलासा देणारी ठरली. फाउंडेशनच्या माध्यमातून गरजूंना मदत करण्याचा उपक्रम सातत्याने राबविला जात असून समाजातील दुर्बल घटकांना आधार देण्याची भूमिका त्यांनी पुन्हा अधोरेखित केली.ङ्गया सांत्वन भेटीदरम्यान बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया समन्वयक तथा उपाध्यक्ष मा. वी. सुधाकर कांबळे, माजी उपसरपंच तथा ऊसतोड कामगार सहकारी संस्थेचे अध्यक्ष अनिल राधे कांबळे, लखन कांबळे, भाऊसाहेब कांबळे, अनिकेत कांबळे, दादा कांबळे, दादा कसबे, गणेश कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, गुड्डू कांबळे, बाळू कांबळे, छोटू कांबळे यांच्यासह गावकरी मंडळी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.ङ्गकांबळे कुटुंबावर आलेल्या दुहेरी आघातामुळे गावात शोककळा पसरली आहे. सामाजिक बांधिलकी जपत संकटसमयी धावून येणाऱ्या 'अलकाश्री फाउंडेशन'च्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. अशा संवेदनशील प्रसंगी समाजातील सजग नागरिक आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेणे हीच खरी माणुसकी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## एसटीच्या 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' नोंदणीला उस्फूर्त प्रतिसाद परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई, : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) डिजिटल सेवांच्या दिशेने पाऊल टाकत 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' उपक्रम राबवायला सुरूवात केली आहे. सवलतधारक प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नोंदणीची संख्या आता १ लाखाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यापर्यंत पोहोचली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.केवळ आठवड्याभरात या उपक्रमांतर्गत एकूण १,००,०२१ प्रवाशांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. यात 'महिला सन्मान योजना' लाभार्थ्यांचा सर्वाधिक सहभाग असून तब्बल ३७,९२७ महिलांनी या आधुनिक सुविधेचा स्वीकार केला आहे. त्याचप्रमाणे 'अमृत ज्येष्ठ नागरिक' योजनेअंतर्गत ३४,९४८ ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी करून डिजिटल प्रवासाच्या नव्या पर्वाचे स्वागत केले आहे. तसेच इतर ज्येष्ठ नागरिक २४,९२७ आणि इतर प्रवासी २,२१९ अशा विविध घटकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. एसटी महामंडळाचा हा उपक्रम केवळ तांत्रिक बदल नसून, प्रवाशांच्या प्रवासाला अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक बनविण्याचा दूरदर्शी प्रयत्न आहे. रोख व्यवहारांच्या पारंपरिक चौकटीतून बाहेर पडत, डिजिटल माध्यमांचा स्वीकार करण्यासाठी प्रवासी वर्ग मोठ्या प्रमाणात पुढे येत असल्याचे या नोंदणीच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे.


एनसीएमसी स्मार्ट कार्डची सक्ती नाही

१ मार्चपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड असल्याशिवाय सवलतधारक प्रवाशांना प्रवास करता येणार नाही, अशी अफवा समाज माध्यमांवर पसरली होती. तथापि, जोपर्यंत ८०% सवलत धारक प्रवाशांची स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य केले जाणार नाही, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रवाशांनी आपल्या जवळच्या बसस्थानक, आगार अथवा अधिकृत खासगी एजंटकडे स्मार्ट कार्ड नोंदणी करावी , असे आवाहन महामंडळातर्फे केले आहे. भविष्यात एनसीएमसी स्मार्ट कार्डमुळे सवलतधारक प्रवाशांना तिकीट खरेदी अधिक सुलभ होणार असून, भविष्यात एकच कार्ड विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी उपयोगात येण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. एसटी महामंडळाने हाती घेतलेला हा अभिनव उपक्रम डिजिटल महाराष्ट्राच्या स्वप्नाला साकार करण्याच्या दिशेने एक भक्कम पाऊल ठरत असून, प्रवाशांच्या विश्वासाच्या बळावर हा प्रवास अधिक वेगाने पुढे जात आहे.

## गंगाराम शिंदे यांचे निधन

हिंगोली प्रतिनिधि, शिवराम कदम

हिंगोलीतील वसमत तालुक्यातील हयातनगर येथील प्रतिष्ठित जेष्ठ नागरिक गंगाराम परबतराव शिंदे यांचे निधन,गंगाराम शिंदे यांचे वार शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी वृधपकाळाने निधन झाले असून मृत्यू समयी त्यांचे वय ९२ वर्ष होते.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांच्यावर शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



सूर्योदय

रविवार ०१ मार्च २०२६

## संपादकीय

### अवकाळीचा फटका

थंडीला निरोप मिळाल्यानंतर उन्हाळ्याची चाहूल लागली असतानाच, मध्येच आलेल्या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचा थेट परिणाम महाराष्ट्राच्या हवामानावर जाणवू लागला आहे. हा पट्टा दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत पसरल्यामुळे राज्यातील अनेक भागात अचानक वातावरण बदलले असून अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात सध्या अंशत: ढगाळ आकाश राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उर्वरित भागामध्ये तापमानवाढ कायम राहणार असल्याने उष्णतेचा त्रास जाणवू शकतो. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील सोलापूरमध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. २३ फेब्रुवारी रोजी पूर्व विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत वादळी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता लक्षात घेता, हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

गत २४ तासांत राज्यातील काही भागांना अवकाळी पावसाचा फटका बसला. मध्यरात्री नागपूर शहरासह जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. ऐन उन्हाळ्यात अचानक कोसळलेल्या पावसामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांची मोठी धावपळ उडाली. दिवसभर कडक ऊन असतानाच रात्री अनपेक्षितपणे पावसाने जोर धरल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. या पावसामुळे शहरातील काही घरांचे नुकसान झाले. राज्यासह देशातील हवामानात मोठा बदल होत आहे. थंडी, पाऊस आणि उन्हाळा अशा तिन्ही हंगामांचा अनुभव येत आहे. सकाळी थंडी आणि दुपारी कडक ऊन अशी स्थिती आहे. उत्तरेकडे थंडी तर राज्यात थंडी जवळपास गायब झाली आहे. पहाटे थोडासा गारठा जाणवतो आहे. राज्यातील काही शहरांत वायुप्रदूषण हा गंभीर मुद्दा बनला आहे.

मुंबईमध्ये वायुप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून हवा घातक बनली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात सध्या पावसाला पोषक वातावरण आहे. उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत असतानाच पावसाने हजेरी लावली आहे. धुळ्यात १४ अंश सेल्सिअस अशी राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवसांत राज्यात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान या भागात पावसाचा अंदाज आहे. गत काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. फेब्रुवारी महिना असूनही पावसाने हजेरी लावली आहे. सकाळी थंडी, दुपारी कडक ऊन आणि अचानक सायंकाळी वादळी वा-यासह पाऊस अशी स्थिती अनेक भागात पाहायला मिळते. या बदलत्या हवामानामुळे नागरिकांबरोबरच शेतक-यांचीही मोठी अडचण झाली आहे. सोमवारी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली.

कर्नाटकपासून मराठवाड्यापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे राज्यात पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर, हिंगोली, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये विजांसह पावसाची शक्यता आहे. इतर भागातही आकाश ढगाळ राहू शकते. पुढील दोन दिवस पावसाचा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला. माजलगाव तालुक्यात वादळी वा-यासह झालेल्या पावसामुळे ज्वारी, हरभरा तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले. परळी तालुक्यातही गहू आणि हरभरा पिकांना फटका बसला. लातूर जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे गारांसह २० मिनिटे पाऊस झाला. अहमदपूर शहर व तालुक्यात, चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथे रविवारी रात्री हलक्या सरी कोसळल्या. शिरूर अनंतपाळ येथे जोरदार वारे आणि पाऊस झाला तर गुडसूर परिसरात रिमझिम पाऊस झाला. उदगीर तालुक्यात ढगाळ वातावरण होते. येरोळ आणि निलंगा परिसरात जोरदार पाऊस झाला. रेणापूर तालुक्यात गारपिटीमुळे हरभरा, गहू, ज्वारी, करडी ही रबी पिके आडवी झाली.

वादळी वा-याने थैमान घातल्याने शेतक-यांची धावपळ उडाली.

ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रम सुरू आहेत. अचानक आलेल्या वादळी पावसाने त्यामध्ये व्यत्यय आला, भाविक भक्तांमध्ये धावपळ उडाली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अवैध बांगलादेशी घुसखोरीविरोधात आक्रमक कारवाई; २०२५ मध्ये २३७६ जण हद्दपार – योगेश कदम

## विधान परिषदेत लक्षवेधीला सविस्तर उत्तर; प्रत्येक पोलीस ठाण्यात विशेष पथक, इंटेलिजन्स–आधारित संयुक्त मोहीम तीव्र, डिटेन्शन सेंटरसाठी २० कोटींची मंजुरी

मुंबई, दि. २८ फेब्रुवारी, २०२६ ङ्गविधान परिषदेमध्ये लक्षवेधी सूचना (कामकाज क्र. ४) अंतर्गत मा. प्रवीण दरेकर यांनी मुंबईतील व्यावसायिक अवैध बांगलादेशी घुसखोरीच्या वाढत्या प्रश्नाबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केले की, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या विषयावर शून्यसहिष्णुतेची भूमिका घेत आक्रमक कारवाई सुरू केली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात इंटेलिजन्स आधारित संयुक्त मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक पोलीस ठाण्यात पाच कर्मचाऱ्यांची विशेष टीम नियुक्त करण्यात आली आहे. एटीएस आणि स्थानिक पोलीस यांच्या समन्वयातून नियमित तपासणी व छापेमारी सुरू आहे.ङ्गङ्गमागील पाच वर्षांतील आकडेवारी सादर करताना त्यांनी सांगितले की, २०२१ मध्ये १०९, २०२२ मध्ये ७७, २०२३ मध्ये १२७, २०२४ मध्ये २०२ आणि २०२५ मध्ये तब्बल २३७६ अवैध बांगलादेशींना हद्दपार करण्यात आले आहे. एका वर्षात दोन हजारांहून अधिक जणांना हद्दपार करून महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली असल्याचे त्यांनी नमूद केले. केंद्र शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार पुरावे निश्चित झाल्यास गुन्हा दाखल न करताही संबंधितांना थेट बीएसएफच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे कारवाईला अधिक वेग आला आहे.

राज्यात प्रथमच डिटेन्शन सेंटर उभारण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कन्स्ट्रक्शन साईट्सवरील कामगारांची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई केली जात आहे. तसेच महानगरपालिका व पोलीस विभाग संयुक्त कारवाईद्वारे फेरीवाल्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करत आहेत

अवैध घुसखोरी रोखण्यासाठी नागरिकांनी संशयास्पद हालचालींबाबत पोलिसांना माहिती द्यावी,

असे आवाहन करण्यात आले. राज्याच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदमांनी ठामपणे सांगितले.ङ्गङ्गउत्तर देत असताना राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की आवश्यक तिथे कोंबिंग ऑपरेशन आणि आवश्यक असल्यास स्पेशल टास्क फोर्सची निर्मिती करण्यात येईल.

# नवसाला पावणारी बाणकोटची कालंबादेवी; शिमगा उत्सवात भक्तांचा भाविक जल्लोष

श्रीवर्धन प्रतिनिधी; कोकणातील पारंपरिक शिमगा उत्सवाला फाल्गुन पौर्णिमेपासून रंगपंचमीपर्यंत मोठ्या भक्तिभावाने सुरुवात होते. या कालावधीत विविध देवी-देवतांच्या पालख्या गावोगावी फिरत असून भक्तांच्या भेटीसाठी जणू देवच त्यांच्या दारी येतो, अशी श्रद्धा आहे.ङ्गङ्गपालखी आगमनाच्या पूर्वसंध्येला गावांमध्ये अंगणात सडा–रांगोळी, दीपप्रज्वलन, ढोल–ताशांचा गजर आणि वाद्यांच्या निनादात उत्सवी वातावरण निर्माण होते. पालखीसोबत पारंपरिक ''संकासुर'' हेही आकर्षण ठरते. त्याचा अनुभव घेतलेल्या भाविकांसाठी हा सोहळा विशेष संस्मरणीय असतो. हा अद्भुत



अनुभव घेण्यासाठी अनेक चाकरमानीदेखील कामधंदे बाजूला ठेवून कोकणात परत येतात.ङ्गङ्गछत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाशी इतिहासाने जोडलेल्या परिसरातील बानकोट गावात वसलेली आदिमाया शक्ती म्हणून ओळखली जाणारी आई कालंबादेवी नवसाला पावणारी म्हणून प्रसिद्ध आहे. वर्षातून एकदा देवी पालखीतून भक्तांच्या भेटीसाठी निघते, तेव्हा भाविक रात्रभर जागून तिच्या स्वागतासाठी उत्सुकतेने थांबलेले दिसतात.ङ्गङ्गकाल रात्री देवीची पालखी भेंडखोळ व वरची आळी परिसरात दाखल झाली. येथे विजय वासुदेव पाटील (बावा भंडारी) यांच्या नातेवाईकांच्या घरी तसेचङ्गउत्तरमुखी मारुती मंदिर भेंडखोळङ्गयेथे भाविकांच्या नवस–ओठ्या व गाऱ्हाण्यांचा स्वीकार करण्यात आला. त्यानंतर पालखी द्वारका नगर दांडा परिसरातील राधाकृष्ण मंदिरात विसावली व तेथील मान स्वीकारून पुढील प्रवासाला निघाली.ङ्गङ्गरात्रभर चाललेल्या या जागर सोहळ्यात लहान–थोर सर्व भक्तगण, ग्रामस्थ आणि पालखी सोबतचे मानकरी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. नवसाला पावणारी अशी ख्याती असल्याने अनेक भाविक आपल्या कुटुंबीयांसह देवीच्या दर्शनासाठी उपस्थित राहतात. तिच्या दर्शनाने जीवनात समाधान आणि आनंद प्राप्त होतो, अशी श्रद्धा भक्तांमध्ये दिसून येते.ङ्गङ्ग''आई भवानीचा उदो आई जगदंबेचा उदो माझ्या कालंबादेवीचा जयजयकार असो'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि भक्तिभावाच्या वातावरणात शिमगा उत्सवाचा हा सोहळा भावपूर्ण रीतीने पार पडला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

मंडणगड प्रतिनिधी

मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे मराठी भाषा गौरव दिन शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांच्या अध्यक्षतेखाली जेष्ठ साहित्यिक वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या वतीने वि.वा. शिरवाडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका स्वरा देवघरकर, शिक्षक प्रतिनिधी बसवंत शिरगिरे,क्रीडा शिक्षक संजय अवेरे, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यालयाच्या मराठी विषयाच्या शिक्षिका स्मिता भोसले यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले.



मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून वक्तृत्व,गीत गायन,निबंध स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धांमधून प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले ते खालील प्रमाणे *निबंध स्पर्धा- प्राथमिक गट- प्रथम अथर्व दुसार द्वितीय- चिन्मयी सुतार, तृतीय स्नेहाली दिवेकर, माध्यमिक गट- प्रथम आर्या जाधव द्वितीय अथर्व कासारे, तृतीय सोनाक्षी तलार उच्च माध्यमिक गट- प्रथम- सायली शिगवण, द्वितीय सानवी पाटील तृतीया अनोमा जाधव *वक्तृत्व स्पर्धा प्राथमिक गट- त्रिधा यादव, द्वितीय सानवी नटे, तृतीय सत्यम वाघ, माध्यमिक गट- प्रथम- जेसीका मळेकर द्वितीय सीमा सुंदेशा, तृतीय समृद्धी खेराडे, उच्च माध्यमिक गट- प्रथम क्र. जानवी शेडगे, द्वितीय श्रावणी कुटेकर, तृतीय श्रेयस सुतार गीत गायन स्पर्धा- प्रथम क्र.-भक्ती कदम, द्वितीय जेसी का मळेकर, तृतीय- जिद्दी मळेकर व पूर्वी मोहिते.उच्च माध्यमिक गट प्रथम क्र.श्रावणी सावंत,द्वितीय-प्रीती बाईत तसेच या तिन्ही स्पर्धांमध्ये ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश हेलोंडे यांनी आपल्या प्रस्ताविकेमध्ये मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व व विष्णू वामन शिरवाडकर यांचे मराठी भाषेमधील योगदान,तसेच मराठी भाषा संस्कृती व संवर्धन याविषयी माहिती प्रकट केली. त्यानंतर मराठी अभिमान गीत ''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी'' हे सामूहिक गाणं गाऊन वातावरण प्रसन्न व मराठीचा अभिमान रुजवला. वि.वा.शिरवाडकर यांच्या कणा या कवितेचे गायन-मधुरा इंगवले व आई या कवितेचे गायनअंकिता पवार यांनी केले. लाटवण हायस्कूलचे सहा.शिक्षक नरेश माटवणकर यांनी मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व थोडक्यात सांगितले. प्राध्यापक सुशील देवकर यांनी काय सांगू राणी मला गाव सुटेना हे गीत स्वरात गायले व यातून संस्कृतीचा बोध दाखवून दिला. सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योती राणे यांनी कुसुमाग्रजांचा जन्म,मराठी भाषा अभिजात भाषा याविषयी सखोल माहिती सांगितली. विद्यालयाचे प्राध्यापक विठ्ठल केंद्रे यांनी विष्णू वामन शिरवाडकर यांच्या वेगवेगळ्या साहित्यांबाबत व स्वतः लिहिलेल्या कवितेचे वाचन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आबासाहेब हुलगे यांनी मराठी भाषा अभिजात भाषा तसेच मराठी भाषा ही साहित्याचीच नव्हे तर ज्ञानाचे आणि व्यवहाराची बनली आहे.शेवटी विद्यालयाचे सहा. शिक्षक प्रकाश हेलोंडे यांनी सर्वांचेआभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## लवेल – घरडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये मध्ये ''सिनर्जी – २०२६'' ह्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची उत्साहात सुरुवात

दिनांक २७ व २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित केलेल्या ह्या स्नेहसंमेलनाचा पहिला दिवस आनंदात व उत्साहात पार पडला.ङ्गपहिल्या सत्रामध्ये आर्ट गॅलरी चे उद्घाटन झाले. त्यात विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे प्रदर्शन चित्र रेखाटन,



रांगोळी, छायाचित्रण, सुलेखन, नैसर्गिक वस्तूंच्या वापरातून शोभायमान वस्तू अशा विविध कलांचे प्रदर्शन केले.ङ्गत्यानंतर क्रीडा, सांस्कृतिक व कला अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद पाटील, उपप्राचार्य डॉ. सचिन पाटील, रजिस्ट्रार प्रा. संदीप मुनघाटे, क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा. एस. के. ढवळे व श्री. एस. जी. बोले तसेच सर्व शाखा प्रमुख व सिनर्जीचे समन्वयक श्री. विक्रमसिंह जाधव उपस्थित होते.ङ्गतसेच विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये अंताक्षरी, नृत्य, गायन, वादन, फॅशन शो, इत्यादी आयोजनाने कार्यक्रमाची उत्तरोत्तर रंगत वाढत गेली. अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदात असा सिनर्जी २०२६ चा पहिला दिवस संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कॉलेजचा विद्यार्थी सचिव कु. वेदांत शिंदे व विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. सई दळवी ह्यांनी मोलाचे योगदान दिले. सर्व प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.

# बैंक ऑफ ईंडियां नविन पनवेल शाखे मधील गलथान कारभार

पनवेल प्रतिनिधी–

सुनील जाधव नवी मुबंई,बैंक ऑफ ईडिंया या बँन्केची नवीन पनवेल येथे शाखा आहे.या शाखेचा आयएफएससी कोड नं,बीकेआयडी,असा आहे.या बँन्के मधे सतत संगणकाचा सरवर डाउन होत असल्यामुळे मुख्यतः पेन्शनधारक , अर्थिक व्यवहाराचे चेक क्लिअरन्स रोख रक्कम भरणे ,तसेच नवीन सभासद साठी अर्ज भरण्यासाठी अशी अनेक बँन्क सबंधित कामासाठी तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. बॅन्केमधे काही संगणक बिघडलेल्या स्थिती मधे आहेत. बँन्केच्या एका ही कर्मचा–यांनी ओळखपत्र परिधान केलेले निर्दशनांस येत नाही.अधिका–यांच्या टेबल वर नांवाची पाटी नाही.शिपाई म्हणुन पदावर काम करणा–या कर्मचारी साध्यावेषा मधे भटकत असतो.या बाबतीत सबंधित अधिका–याशी चौकशी केली असता आपण आमची तक्रार करु शकता असे उध्दट वाक्य एकायला मिळते.बँन्केच्या व्यवस्थापिका पुर्बी (मो.नं ९८२७५७०४७८८) मॅडम असुन त्या गप्प असतात.मात्र नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.तरी या बाबत या बँन्केच्या मुख्य व्यवस्थापकांनी वेळे वर लक्ष घालण्याची गरज आहे.अन्यथा बँन्क ऑफ ईडिंया नविन शाखे विरोधात आदोंलन छेडण्यांत येईल असा ईशारा नागरिकांनी दै,सुर्यादयच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला.




# प्राथमिक शाळा खेर्डी चिंचघरी सती विद्यायलयामराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

उपसंपादक प्रदीप पवार

सह्याद्री शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा खेर्डी चिंचघरी (सती) या विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन या कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक अरविंद सकपाळ, शिक्षक वृंद यांच्या शुभहस्ते मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य कुसुमाग्रज म्हणजेच विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी नुपूर गमरे, जान्हवी यादव, श्लोक भोसले, आरव खालकर, सान्वी दवंडे, दुर्वांक शिंदे व शौर्य पोटे या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व




अधोरेखित करणारे भाषणे, कविता वाचन, अभंग गायन उस्फूर्तपणे केले. या दिनाचे औचित्य साधून लहान गटातून कु. रियांश प्रशांत कदम तर मोठ्या गटातून सुयश संतोष सोलकर यांना वाचकवीर पुरस्कार प्रदान करण्यात आला. वृषाली राणे यांनी मराठी भाषेचा इतिहास, समृद्ध साहित्य परंपरा या विषयी सखोल मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक अरविंद सकपाळ सर यांनी मराठी भाषेचा सन्मान राखण्याचा व दैनंदिन जीवनात तिचा जास्तीत जास्त वापर करण्याचा व पुस्तक वाचनातून आपली भाषा समृद्ध करण्याचा संदेश विद्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रमाचे आयोजन शिक्षिका वर्षा सकपाळ यांनी केले .या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक अरविंद सकपाळ, ज्येष्ठ शिक्षिका मनीषा कांबळी, रश्मी राजेशिर्के, संदेश सावंत, अपूर्वा शिंदे, विनया नटे, वृषाली राणे, अर्चना देशमुख, ज्योती चाळके, रूपाली खरात, वर्षा सकपाळ, शितल पाटील, स्वरा भुरण व शिक्षकेतर कर्मचारी विजया मौजे, विनोद उदेग, एकनाथ चाळके व प्रतिभा तांबिटकर उपस्थित होते.

## मुंबई मराठी ग्रंथ संग्रालयात कुसुमाग्रज जयंती निमित्त मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

मुंबई / प्रतिनिधी

गोरेगाव पश्चिम येथील आय. बी. पटेल शाळेत विस्थापित असलेल्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रालयात ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. ङ्गया निमित्ताने ग्रंथालयात विविध नामवंत मराठी साहित्यिकांच्या पुस्तकांचे आकर्षक प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रदर्शनाला ग्रंथालयातील पदाधिकारी, सभासद, कर्मचारी वर्ग तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थितांनी विविध पुस्तकांचे अवलोकन करून वाचनाचा आनंद लुटला.कार्यक्रमाच्या शेवटी 'आपली माय मराठी वाचनाच्या माध्यमातून अधिक समृद्ध करूया' असा संकल्प सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल प्रेम आणि अभिमानाची भावना अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.




# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

शाळांमध्ये स्क्रीनमुक्त शनिवार

लहान मुलांमध्ये मोबाईल,काम्पुटर आणि तत्सम डिजिटल साधनांमुळे वाढत चाललेल्या डिजिटल व्यसनाचे गंभीर दुष्परिणाम लक्षात घेता राज्य सरकारने या समस्येवर उपाय म्हणून टास्क फोर्सची नियुक्ती केली आहे. पुढील अधिवेशनापूर्वी हा टास्कफोर्स आपला अहवाल सरकारला सादर करणार असून त्यानंतर सरकार



पुढील कार्यवाही करणार आहे. याच अनुषंगाने डिजिटल व्यसनापासून मुलांना दूर नेण्याच्या उपाययोजना बद्दल राज्याचे माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्यांशी आजचा साप्ताहिक संवाद.

१ डिजिटल माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुलांवर नेमके काय दुष्परिणाम होत आहेत?

रिस्पॉन्सिबल नेटिझम या संस्थेच्या अभ्यासानुसार महाराष्ट्रात उपचारांसाठी येणाऱ्या दर १० मुलांपैकी २ मुलं हि केवळ गेमिंग व्यसनामुळे आढळतात. तर ४० टक्के मुलांमध्ये इंटरनेट डिपेंडेंसी माध्यम ते तीव्र स्वरूपात आढळली आहे. यामुळे चिडचिडेपणा,टेक नेक मानेचे विकार आणि नैराश्यासारख्या समस्या वाढत आहेत हे अत्यंत धक्कादायक आहे. जागतिक गेमिंग बाजारपेठ देखील २० हजार कोटी रुपयांपर्यंत विस्तारली असून भारतात हे प्रमाण ८६० कोटी इतके आहे. यामागे मोबाईल,कम्प्युटरचा वापर हि प्रमुख कारण आहेत.

२सरकारने नेमलेल्या टास्कफोर्सचा उद्देश काय आहे?

मुलांमध्ये वाढत चाललेल्या गंभीर डिजिटल व्यसनाचे दुष्परिणाम लक्षात घेऊनच राज्य सरकारने टास्क फोर्स नेमला आहे. या टास्कफोर्समध्ये सर्व प्रकारचे तज्ज्ञ नियुक्त करण्यात आले असून हा फोर्स अशा प्रकारच्या गेमिंग ऍप चा आणि त्याची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचा सविस्तर अभ्यास करणार आहे. टास्कफोर्सचा अहवाल पुढील अधिवेशनापूर्वी प्राप्त झाल्यानंतर सरकार पुढील कार्यवाही करणार असून अशा प्रकारे मुलांच्या मानसिकतेवर परिणाम करणाऱ्या गेमिंग कंपन्यांवर फौजदारी गुन्हा देखील दाखल केला जाईल.

३ या समस्येवर सरकारचा कृती आराखडा नेमका काय आहे?

या समस्येवर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावरील इ स्पोर्ट्स स्पर्धा मुंबईत येणार आहे. तांत्रिक नियंत्रण उपाय करताना गेमिंग प्लॅटफॉर्म साठी इ केवायसी आणि टाइम आउट फीचर्स अनिवार्य करण्यात येणार आहे. महाराष्टरातील शाळांमध्ये स्क्रीनमुक्त शनिवार हा उपक्रम राबविला जाणार आहे. जिल्हास्तरावर सायबर वेलनेस सेंटर देखील सुरु करण्यात येणार आहे. शिवाय शालेय अभ्यासक्रमात डिजिटल स्वच्छतेचा समावेश करण्यात येणार आहे. अशा विविध उपाययोजना सरकार आगामी काळात करणार आहे.

२ दखल

मुंबईत चौथ्या बिल्डईएलईसी आणि पहिल्या कॉम्पलेकचे आयोजन

इंडियन इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयईईएमए) ने मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे कॉम्पलेकच्या पहिल्या आवृत्तीसोबत




बिल्डईएलईसीच्या चौथ्या आवृत्तीचे आयोजन केले. या तीन दिवसीय कार्यक्रमाचे उद्दिष्ट बिल्डिंग इलेक्ट्रिकल आणि कंपोनेंट्स मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टमसाठी एक केंद्रित सोर्सिंग आणि नेटवर्किंग प्लॅटफॉर्म प्रदान करणे होते. १६० हून अधिक प्रदर्शक आणि १५०+ प्रमुख खरेदीदारांसह सुमारे १,००० संरचित बिटूबी बैठका असलेले हे प्रदर्शन भारतातील इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स मूल्य साखळीमध्ये व्यवसाय वाढ, पुरवठादार नेटवर्क मजबूत करणे आणि उद्योग सहकार्याला गती देण्यासाठी डिझाइन केलेले होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना दिल्लीतील भेलचे अभियांत्रिकी आणि संशोधन आणि विकास संचालक एस.एम. रामनाथन म्हणाले, ''बिल्डईएलईसी–कॉम्पईएलईसी इव्हेंट प्लॅटफॉर्म इलेक्ट्रिकल उद्योगासाठी एक महत्त्वाचा पूल म्हणून काम करतो.'' त्यांनी पुढे सांगितले की, पॉवर इन्फ्रास्ट्रक्चर प्रचंड वेगाने वाढत आहे आणि कमी व्होल्टेज (एलव्ही) ते अतिरिक्त उच्च व्होल्टेज (ईएचव्ही) पर्यंत उपकरणांची प्रचंड आणि तातडीची मागणी आहे. ''या क्षेत्राला घटकांचा सतत पुरवठा आवश्यक आहे, ज्याशिवाय उपकरणे पूर्ण होऊ शकत नाहीत. म्हणूनच वीज पायाभूत सुविधांच्या वाढीसाठी घटक उद्योग अत्यंत महत्त्वाचा आहे.''

३नोंद

.पुढल्या पिढ्यांच्या अस्तित्वासाठी वृक्ष लावू चला.

शहरांचा विकास सध्या झपाट्याने होताना दिसतोय.मेट्रो मोनो आणि वाहतुकीसाठी अत्याधुनिक पुलांचे बांधकाम वेगाने सुरू असलेले दिसतेय.त्याचवेळी मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या इमारती आणि व्यावसायिक बांधकाम देखील जोरात सुरू आहे.मात्र विकासाच्या या सगळ्या गदारोळात मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढतेय, आणि वृक्षतोड देखील तितक्याच झपाट्याने होताना दिसतेय.परंतु पर्यावरण संवर्धनाचा केवळ आव आणून वृक्ष वेली हा केवळ सजावटीचा भाग बनलेला असून प्रत्यक्षात मात्र वृक्षसंवर्धन न केल्यामुळे पर्यावरणाचा वेगाने ऱ्हास होतोय आणि अगदी हे दुष्टचक्र असेच सुरू राहिले तर पुढील काही दशकांत पृथ्वीवरील मानवी अस्तित्वच नष्ट होण्याची भीती पर्यावरण रक्षक संस्थाकडून व्यक्त केली जात आहे.याच पार्श्वभूमीवर हवामान बदलाशी लढन्यासाठी ,सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी आणि वृक्ष संवर्धन करून शाश्वत विकास सुनिश्चित करण्यासाठी मुंबईत येत्या ७ आणि ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय वृक्ष संवर्धन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.अमेनीटी ट्री केअर असोशिएशन आणि नानाजी देशमुख प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

जलद शहरीकरणामुळे वृक्ष संरक्षण आणि संवर्धन याकडे दुर्लक्ष होत असून राज्य सरकार ,महानगर.पालिका आणि स्थानिक संस्थांनी वृक्ष संवर्धन मानके,तांत्रिक शिक्षण आणि शहरी वृक्ष कायद्याच्या दिशेने मजबूत धोरण राबविण्याची गरज असल्याचे मत या परिषदे संदर्भात माहिती देताना अमेनिती चे संचालक वैभव राजे यांनी व्यक्त केले.यंदाच्या दुसऱ्या वर्षाच्या या आंतरराष्ट्रीय वृक्ष परिषदेची संकल्पना ही वाढती शहर आणि हिरवागार परिसर अशी असणार आहे.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक सूर्योदय

रविवार ०१ मार्च २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# कवडोली गावची ग्रामदेवता जाकमाता आई निघाली गाव भेटीला

दैनिक सूर्योदय केळशी प्रतिनिधी

दापोली तालुक्यातील कवडोली गावचची ग्रामदेवता जाखमाता देवी पन्नास वर्षानंतर प्रथम गाव भेटीला निघाली आहे. मंडणगड तालुक्यामध्ये वेळास ,वेसवी, बाणकोट.



श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर, बागमांडला, कोलमांडला. दापोली तालुक्यातील केळशी अशा मार्गाने गाव भेट करीत असे. गेल्या पन्नास वर्षापासून ही परंपरा बंद होती. परंतु आता नवीन पिढीने आपली संस्कृती जपण्यासाठी व पुढील पिढीला सणाचं महत्त्व करण्यासाठी ही परंपरा ५० वर्षानंतर पुन्हा चालू केली आहे. ङ्गदिनांक २७/२/२६ रोजी पारंपारिक प्रमाणे पालखी गाव भेटीला निघाली आहे मांदिवली बाईतवाडी, आनंदवाडी, बाजारपेठ, सावंतवाडी, चिंचघर, गोकुळ गाव, गुडेघर ,पन्हाळी मार्गे जावले येथे जाऊन वस्ती करून. दिनांक १/३/२६ रोजी केळशी , उंबरशेत,रावतोली गाववाडी, कोंडवाडी, केळकोणडवाडी येथे गाव भेट घेऊन रात्री पुन्हा आपल्या गावात येईल. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावचे अध्यक्ष रमेश तांदळे ,रवींद्र हूमणे ,उत्सव कमिटी अध्यक्ष प्रकाश वजीरकर ,किरण राऊत, वैभव तांदळे, मुंबई अध्यक्ष प्रकाश जावेत, नरेश तांदळे, संतोष वजीरकर , सुरेश वजीरकर ,हनुमान प्रसादिक मंडळाचे अध्यक्ष संतोष पंदिलकर ,सरपंच प्रदीप चिंचघरकर, पोलीस पाटील मिथुन चीचंघरकर सुरेश कोशिंकर , जाखमाता देवी क्रिकेट संघ महिला मंडळ ग्रामस्थ व कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले आहे त्यामुळे गावात आनंदाचे वातावरण आहे. रावतोली पोलिसपाटील राजेंद्र शिगवण यांचे सहकार्य लाभणार आहे.

# आबलोली येथील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद निर्मल ग्रामपंचायत आबलोली आणि आरोग्य रुग्णालय रत्नागिरी यांचा स्तुत्य उपक्रम

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील आबलोली गावचे सुपूत्र आणि तंटामुक्ती समिती अध्यक्ष तसेच बौद्धजन सहकारी संघ तालुका गुहागर (रजि.) या संस्थेचे उपाध्यक्ष तसेच रक्तदानाची शतकपूर्ती साजरी करून अनेकांना रक्तदान करण्यास प्रेरणा देणारे विद्याधर राजाराम कदम तथा आप्पा कदम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान तसेच ''हिंद - दी - च ा द र अभियान''अंतर्गत निर्मल ग्रामपंचायत आबलोली आणि जिल्हा आरोग्य रुग्णालय रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने गुहागर तालुक्यातील आबलोली येथील गारवा कृषी पर्यटन केंद्राचे मालकाने राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्राप्त प्रगतशील शेतकरी सचिन कारेकर यांच्या गारवा कृषी पर्यटन केंद्र आबलोली येथे भव्य दिव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे. गारवा कृषी पर्यटन केंद्र येथे मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले त्यानंतर रक्तदान शिबिराला प्रारंभ करण्यात आला यावेळी निर्मल ग्रामपंचायत आबलोली सरपंच सौ. वैष्णवी वैभव नेटके, ग्रामपंचायत अधिकारी बाबुराव सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य सौ. वृषाली वैद्य, सौ. पायल गोणबरे, यशवंत बागडे, अनंत पागडे, दत्ताराम कदम,



पोलीस पाटील महेश भाटकर, माजी सरपंच महेंद्र (आप्पा)कदम, प्रमेय आर्यमाने, कृषी सहाय्यक बेले, दत्ताराम कदम, सचिन कारेकर यांचे सह जिल्हा रुग्णालय रत्नागिरीचे डॉ. आकाश पन्हाळे, डॉ. अथर्व बेंद्रे, सृजा पवार, मानसी भाटकर, जयश्री मॅथ्यू, प्रमोद चाटे, अमित जगताप ,संदीप वाडेकर, विश्वदीप कदम, योगेश भोसले,, विक्रांत पागडे, सुजय पवार, योगेश गोवळकर, सुमित पवार, सुशांत साळवी, मनीष कदम, नितीन मोहिते, वैभव निवाते, समीर शिंदे यांच्यासह अनेक रक्तदाते, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# पोफळी पवारवाडी येथे निवासी शिबिरात विशेष आरोग्यविषयक व्याख्यान

शिरगाव प्रतिनिधी चिपळूण तालुक्यातील पोफळी (पवारवाडी) येथे मंदार एक्युकेशन सोसायटी संचालित राजाराम शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय (डिप्लोमा) यांच्या राष्ट्रीय सेवा योजना () अंतर्गत आयोजित निवासी शिबिरामध्ये विशेष आरोग्यविषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.ङ्गया



व्याख्यानामध्ये आरोग्य व स्वच्छता, संतुलित आहार, जीवनशैलीजन्य आजारांचे प्रतिबंध, व्यसनमुक्ती, तसेच प्राथमिक उपचार यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी कार्यक्रम अधिकारी, शिक्षकवृंद, स्वयंसेवक व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. व्याख्यानातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण होऊन समाजसेवेची जाणीव अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.ङ्गनिवासी शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रम राबवून समाजोपयोगी कार्य करण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन स्वयंसेवकांनी केले.

# चिपळूण नगर परिषद वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा

उपसंपादक प्रदीप पवार.

चिपळूण नगर परिषदेच्या वतीने लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय यांच्या सहकार्याने इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात काव्यवाचन स्पर्धा, कथाकथन सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष उमेश सकपाळ यांच्या हस्ते संविधान व ग्रंथपूजनाने झाले, तर मुख्याधिकारी संजय जाधव यांच्या हस्ते श्रीफळ



वाढवण्यात आले. या वेळी बोलताना नगराध्यक्ष उमेश सकपाळ यांच्यासह मान्यवरांनी मराठी भाषेची महती अधोरेखित केली. ''मराठी ही केवळ भाषा नसून आपली ओळख, संस्कृती आणि परंपरेचा पाया आहे. मराठी भाषेचे जतन व संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असे सांगितले. व्यासपिठावर मुख्याधिकारी संजय जाधव, कवी अरुण इंगवले व गटनेते शारीकांत मोदी उपस्थित होते. काव्यवाचन स्पर्धेत एकूण १५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. सुहास बारटक्के, प्रा. सोनाली खर्चे व रविंद्र गुरव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप पवार यांनी केले. रविवार, दिनांक १ मार्च रोजी राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते साहित्यिकांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमात काव्य स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती हर्षाली पवार, नगरसेवक शशिकांत मोदी, नगरसेविका अंजली कदम, नीलम जाधव, पल्लवी महाडिक, उमा देसाई, वैशाली कदम, महिला व बालकल्याण समिती सभापती रसिका देवळेकर, बांधकाम सभापती कपिल शिर्के, अजय भालेकर, उद्यान विभाग प्रमुख बापू साडविलकर, माजी उपनगराध्यक्ष बापू काणे, ऋचा भागवत, प्रा. संतोष गोणबरे, विनायक ओक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे अध्यक्ष राष्ट्रपाल सावंत, कांता कानिटकर, निहार कोवळे, प्रदीप मोहिते, संदेश पवार, छाया पोटे, अपर्णा नातू, मुजफ्फर सय्यद, सुनिल खेडेकर, शरद तांबे, रमण डांगे, प्राची जोशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शशिकांत मोदी यांनी केले. कॉलेज जीवनात आपण कविता केल्या बक्षिसे मिळवली याची आठवण सांगीतली. तसेच नगर पालिकेतील सध्याचे सहकारी पदाधिकारी यावर त्यांनी कविता सादर केली व उपस्थितांची दाद मिळवली. कथाकथनामध्ये मंदार ओक, ऋचा भागवत व योगेश बांडागळे यांनी सांगीतलेल्या कथांनी कार्यकमात रंगत आणली.

# संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे मराठीभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा...

सुधागड पाली/ राम तुपे

ङ्गसंत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून स्वातंत्रवीर वि. दा. सावरकर २६ फेब्रुवारी पुण्यतिथी ,ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा मराठी राजभाषा दिन,नोबेल पुरस्कार प्राप्त सी.व्ही रमण यांच्या शोधनिबंधानिमित्त २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन या तिन्ही दिनाचे एकत्रित आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या तीनही थोर व्यक्तिमत्वाबद्दल सखोल माहिती सांगितली.ङ्ग मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या कविताचे वाचन,मराठी भाषेचा गोडवा सांगत असताना मराठी भाषेबद्दल, संस्कृती बद्दल सविस्तर माहिती सांगितली.या कार्यक्रमानिमित्त जेष्ठ शिक्षिका शिंदे एस ए यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व सांगत कवी कुसुमाग्रज यांच्या जिवन परिचय करून दिला तसेच प्रा. सोनल ठकोरे यांनी वि.दा.सावरकर





यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील घडलेल्या घटना सांगत असताना अंगावर शहारे आणणारे प्रसंग सांगितले.सहा.शिक्षिका विद्या भिसे यांनी सि व्ही रमन यांच्या बद्दल माहिती सांगत असताना विज्ञानातील त्यांचे योगदान, नवनवीन शोध,त्यांच्या कार्याची महती सांगितली.ङ्ग यावेळी जेष्ठ शिक्षक अशोक शिंदे,नागेश सायगावकर,भूषण सुतार,जेष्ठ शिक्षिका स्वाती शिंदे,जयश्री अहिरराव, विद्या भिसे,सोनल ठकोरे आदी शिक्षक वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सोनल ठकोरे यांनी उत्तमरीत्या केले.

# तिसरी महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ मध्ये मोहन विद्यालयाचे दैदीप्यमान यश

उपसंपादक प्रदीप पवार

महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ या स्पर्धेत मोहन विद्यालय व कनिष्ठ



महाविद्यालय, आकले येथील विद्यार्थी कुमार आदित्य प्रदीप जाधव याने उत्कृष्ट कामगिरी करत पाच किलोमीटर चालणे या प्रकारात उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेत राज्यभरातील अनेक गुणवान खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या आणि कठीण स्पर्धेत आदित्यने दाखवलेली शिस्तबद्ध तयारी, सातत्य आणि जिद्द यामुळे त्याला हे यश मिळाले. त्याच्या या कामगिरीमुळे विद्यालयाचा नावलौकिक राज्यपातळीवर वाढला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय रामचंद्र वाघमारे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी आदित्यचे मनःपूर्वक अभिनंदन केले. पुढील स्पर्धांसाठी त्याला शुभेच्छा देत, भविष्यात आणखी मोठे यश मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आदित्यच्या या यशामुळे विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

# शिशुविहार खेर्डी- चिंचघरी सह्याद्री संस्कार नर्सरी व प्ले स्कूल(सती) येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न

उपसंपादक प्रदीप पवार

विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्म दिवसानिमित मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला गेला. सर्व



प्रथम विदयालयाच्या मुख्याध्यापिका ममता ठसाळे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. शिक्षिका दीक्षा परब यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व विदयार्थ्याना समजेल अशा रोजच्या व्यवहारातील उदाहरणा वरून उलगडून सांगितले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना एक उपक्रम पण देण्यात आला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षिका आदिती जाधव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका ममता ठसाळे, शिक्षिका अश्विनी कांबळे, साक्षी जाधव, तन्वी लटके, शैलजा पड्याळ, अदिती जाधव, गौरी लाड तसेच मदतनीस चाळके बाई यांनी परिश्रम घेतले.

# मंडणगड येथे १ मार्चला स्वामी समर्थ महाराज पालखी आगमन

मंडणगड प्रतिनिधी : अक्कलकोट निवासी श्री देव श्री स्वामी समर्थ महाराज यांची अक्कलकोट येथून येणाऱ्या पालखीचे मंडणगड येथे १ मार्च रोजी आगमन होणार आहे. यानिमित्त श्री स्वामी समर्थांच्या पालखीच्या आगमन व पादुका, पालखी दर्शन सोहळ्याचे आयोजन नगरपंचायत व्यापारी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.ङ्गङ्गश्री देव श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीचे आगमन शहरातील व्यापारी संकुल येथे सकाळी ९.३० वाजता होणार असून दुपारी २ वाजेपर्यंत भक्तांना दर्शन व महाप्रसाद होणार असल्याचे व्यापारी संघटना अध्यक्ष रणवीर लांडे, रुपेश साळुंखे व ओंकार लेंढे यांनी कळविले आहे.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )